NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना महामारी नंतरचे जागतिक परिणाम व भारत

**प्रा. एन. एल. गायकवाड,**
श्री शिवशाहू महाविद्यालय, सरुड, ता. शाहूवाडी.

..................................................................................................................

**प्रस्तावना:**

आत्तापर्यंत जगाच्या इतिहासात संपूर्ण जगावर अतिशय खोलवर परिणाम करणाऱ्या ठळक घटनामध्ये आपणास कोरोना महामारीची नोंद करावी लागणार आहे. ही महामारी विश्वव्यापी आहे. कोरोनाचे संकट प्रत्येक देशापुढे आहे. प्रत्येक देश आपले अस्तित्व टिकविण्यासाठी या महामारीविरोधात संघर्ष करतो आहे. आज अमेरिका, इटली या प्रगत देशातील मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या पहाता या संकटाच्या महाभिषणतेची जाणिव आपणास होत आहे. या जाणिवेपोटी आज संपूर्ण मानवजात भितीयुक्त व प्रचंड तणावग्रस्त वातावरण प्रचंड मानसिक तणावाखाली वावरताना आपण पाहत आहोत. मानवी जीवन अस्ताव्यस्त झालेले आहे. याच पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधासाठी “कोरोना महामारी नंतरचे जागतिक परिणाम व भारत” हा विषय निवडला आहे.

**उद्दिष्टये:**

१. कोरोना पुर्वकालीन जगाचा अभ्यास करणे.
२. कोरोनोत्तर जगातील व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. कोरोनाचा भारतावरील परिणामाचा अभ्यास करणे.

जग अस्वस्थतेच्या उंबरठयावर आहे. याचे कारण म्हणजे प्रत्येक व्यक्ती जगण्यासाठी विज्ञानाच्या संशोधनाकडे आशेने पाहतो आहे. कोरोनावरील रामबाण लस सापडावी व हे संकट टळावे असे प्रत्येकाला वाटते आहे. परंतु असे घडताना दिसत नाही.

**कोरोना पुर्वकालीन जग:**

जागतिकीकरणानंतर जग हे अत्यंत जवळ आलेले होते. तंत्रज्ञानाचा विकास, राष्ट्राराष्ट्रातील वाढता व्यापार, वाढते दळणवळण व त्यातून वाढत गेलेले राष्ट्राराष्ट्रातील परस्परावलंबन इ. कारणामुळे राष्ट्राराष्ट्रातील सीमारेषा पुसट होत जाऊन व तंत्रज्ञानाची देवाणघेवाण वाढून परस्परांमध्ये व्यापार व आर्थिक संबंध मोठया प्रमाणावर वाढले होते. राष्ट्राराष्ट्रांचे विविध गट व संघटना तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेसारखी आंतरराष्ट्रीय संघटना अत्यंत प्रभावीपणे कार्य करताना आपण पाहत होतो. थोडक्यात अमेरिका चीनमधील व्यापार युध्द किंवा अन्य काही राष्ट्रांमधील छोटे मोठे संघर्ष असे काही अपवाद वगळता मानवी प्रवास विकासाच्या दिशेने व्हावा सर्व मानव जातीवरील संकट व समस्या परस्परांच्या सहकार्याने सोडविण्यावर भर होता. संघर्षापेक्षा समन्वय यावर जास्त भर होता. युनो सारख्या संघटनेच्या व्यासपीठावर विविध समस्यावर चर्चा विनिमय होऊन, तेथील निर्णय सर्वजण स्वत:हून बंधनकारक मानत होतो. थोडक्यात कोरोनापूर्व काळात संपूर्ण जगातील राष्ट्रांमध्ये परस्परांमध्ये स्नेहाचे सद्‌भावाचे व सहकार्याचे वातावरण होते. याला निश्चित काही अपवाद होते. काही वेळा काही राष्ट्रांनी सहकार्याऐवजी संघर्षाची भूमिका घेतली असली तरी संपूर्ण जगातून जागतिक लोकमताचा दबाव येत होता. मात्र कोरोना महामारीनंतर जगावर प्रचंड ताण निर्माण झाला व पूर्वीच्या सर्व व्यवस्थेवर संशय घेतला जाऊ लागला.

**कोरोनोत्तर जागतिक व्यवस्थेवरील संभाव्य परिणाम:**

कोरोना महामारी संकटाचे स्वरुप व त्याची भीषणता पाहता संपूर्ण जगात फार मोठी स्थित्यंतरे घडून येण्याची शक्यता आपणास दिसून येते. या संकटाने जरी संपूर्ण जग आपल्या कवेत घेतले असले तरी त्याचा मुकाबला अनेक राष्ट्रांनी एकत्र येऊन राष्ट्रांनी एकत्र येऊन करण्याऐवजी तो प्रत्येक राष्ट्र स्वतंत्ररित्या करताना दिसत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये या विषयावर अद्याप देखील चर्चा होताना दिसत नाही व संयुक्त राष्ट्र संघटना देखील या संकटाचा मुकाबला करताना दिसत नाही. जागतिक आरोग्य संघटनेचे योगदान मोठे असावयास

हवे होते. मात्र तिच्याविषयी संशयाचे वातावरण निर्माण होऊन अमेरिकेने W.H.O ची आर्थिक मदत थांबविलेली दिसते. म्हणून बिल गेट्स सारखे संगणक तज्ञ आज नव्या प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेची गरज व्यक्त करत आहेत. व्यापार व दळणवळण आज पूर्णत: ठप्प आहेत. प्रत्येक राष्ट्र स्वत:च्या अस्तित्वासाठी जोरदार प्रयत्न करीत आहे. थोडक्यात आज अत्यंत विचित्र व काळजीयुक्त जगासमोर अनेक आव्हाने आहेत. यामध्ये आरोग्य, शिक्षण, अर्थव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, संस्कृती, समाज या सर्व क्षेत्रामध्ये प्रचंड आव्हाने आहेत. हे संकट कधी टळेल हे सांगता येत नाही.

**कोरोनाचा भारतावरील परिणाम:**

वरील जागतिक पार्श्वभूमी संदर्भात आपल्या देशाचा विचार करता एक वेगळेपण आपल्या लक्षात येते. ते म्हणजे इतर देशांच्या तुलनेत 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' या म्हणीप्रमाणे चीन कोरीया, अमेरिका यांच्यापेक्षा आपणास अवधी जास्त मिळाला. त्याचा परिणाम केंद्र सरकार व राज्य सरकार परस्पर सहकार्याने व विश्वासने संकट विरोधात युध्द पुकारले आहे. त्यामुळे मृत्युदर कमी आहे. भारतीय जनतेस पोलिसी बळाच्या आधारे लॉकडाऊनचे नियम पाळावयास भाग पाडले जात आहे. तसेच शासनाच्या आव्हानांस प्रतिसाद देत आहेत. डॉक्टर, आरोग्य सेवक, पोलिस, सफाई कामगार, प्रशासकीय कर्मचारी यांच्याबद्दल ऋण व्यक्त केले जात आहे. लोक गंभीर व कर्तव्यदक्ष होत आहेत. अर्थात असे असले तरी याचा विपरीत परिणामांचा अभ्यास महत्वाचा आहे. तो म्हणजे देशात लॉकडाऊन काळात आपले सरकारी कार्यालय, वाहतूक व दळणवळण, सर्व प्रकारचे उद्योग, व्यापार, शिक्षण संस्था, सांस्कृतिक कार्यक्रम हे बंद होते. याचा परिणाम कौटुंबिक हिंसाचार, बेरोजगारीत वाढ झाली. शिक्षक, पालक, विद्यार्थी संभ्रमावस्थेत आहेत. व्यापार ठप्प त्यामुळे उलाढाल ठप्प, वेतन कपात, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम बंद, शेती उद्योग सुरु असला तरी द्राक्षे, आंबा, डाळींब, लिंबू उत्पादक संकटात आहेत. वेलवर्गीय पिके शेतकऱ्यांनी नांगरली आहेत. शेतमाल पडून आहे. योग्य भाव नाही. त्यामुळे तो भयग्रस्त आहे. त्यामुळे ही परिस्थिती न भूतो न भविष्यती आहे. अशी अभूतपूर्व आहे.

**समारोप :**

शेवटी कोरोना हे संपूर्ण मानव जातीसमोरील अभूतपूर्व असे महासंकट आहे. त्याच्या फार मोठया दुष्परिणामांना आपना सर्वांना सामोरे जावे लागणार आहे. व त्यासाठी आपणास आत्मविश्वासने समस्यांचे निराकरण करावे लागणार आहे.

ज्याप्रमाणे एखादे वादळ येते अन जाते. ते क्षणार्धाचे असते. पण त्या वादळाने केलेल्या नुकसानीमुळे आपले जीवन बदलून जाते. तसे कोरोना महामारीच्या संकटाचे आहे. कोणतेही वादळ आपणाभोवती घोंघावताना आपण शिर झुकवतो व वादळ गेले की पुन्हा ताठ मानेने जगतो. तसेच लॉकडाऊन काळात सर्व नियमांचे पालन करणे हिताचे ठरणार आहे. या संकटाचा सामना अधिक धिरगंभीरपणे केल्यास लवकरच संकट हे टळेल. व अखिल मानवजात पुन्हा यशस्वीपणे वाटचाल करील असा विश्वास वाटतो.

**संदर्भ:**

१. दै. लोकसत्ता, दि. २२/०४/२०२० अग्रलेख.
२. महाराष्ट्र टाईम्स, दि. २६/०४/२०२० अग्रलेख.
३. आंतरराष्ट्रीय राजकारण, डॉ. अशोक चौसाळकर (लेख).